वाचा :- १) गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती सुरगाणा यांचे कडील पत्र क्रमांक पसस/शि/५१६/०२ दिनांक ३१/५/२००२

२) मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे कडील ज्ञापन क्र.शि/प्राथ-९/६३१/२००२ दि.८/१०/२००२

३) श्री.चंदर उखा चौधरी प्राथ.शिक्षक यांनी ज्ञापनास दिलेला खुलासा दि.७/११/२००२

४) मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे कडील आदेश क्र. शिक्षण/प्राथ-९/५३/२००४ दि.३०/१/२००४

५) मा.सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे कडील अहवाल क्र.विशा ४/खाचौ/ सी.आर.९/२००४ दिनांक २६/५/२००५

६) या कार्यालयाची अंतीम कारणे दाखवा नोटीस क्र.शिक्षण/प्राथ-९/१७७/२०१० दि.१३/५/२०१०

७) मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे दालनात सुनावणी दिनांक ११/९/२०१७

८) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक१२/०९/२०१७

---

आदेश

शिक्षण विभाग (प्राथ) जि.प.नाशिक
जा.क्र./शिक्षण/प्राथ-९/६९५/२०१७
दिनांक१३/०९/२०१७

ज्याअर्थी श्री.चंदर उखार चौधरी प्राथमिक शिक्षक जिल्हा परिषद शाळा बोरचोंड ता.सुरगाणा येथे काम करीत असतांना शासकिय कामकाजात गैरवर्तणूक व नियमबाहय वर्तन केल्याने संदर्भ क्र.१ गट शिक्षण अधिकारी,पंचायत समिती सुरगाणा यांचे कडील पत्र क्रमांक पसस/शि/५१६/२००२ दिनांक ३१/५/२००२ अन्वये श्री.चौधरी यांचे विरुध्द खाते निहाय चौकशी करणे कामी दोषारोप पत्र क्र.१ ते ४ सादर करण्यात आले होते.

ज्याअर्थी श्री.चंदर उखा चौधरी प्राथमिक शिक्षक यांना संदर्भ क्र.२ मा.मु.का.अ.जि.प. नाशिक यांचे कडील ज्ञापन क्र.शि/प्राथ-९/६३१/२००२ दि.८/१०/२००२ अन्वये यांचे ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्र.१ ते ४ बजाविण्यात आले असुन सदर ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्र.१ ते ४ ला श्री.चौधरी यांनी दिनांक ७/११/२००२ रोजी खुलासा सादर केला आहे.

ज्याअर्थी श्री.चौधरी प्रा.शि.यांनी ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ ला दिलेला खुलासा दिनांक ७/११/२००२ असमाधानकारक असल्याने संदर्भ क्र.४ अन्वये मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे कडील आदेश क्र. शिक्षण/प्राथ-९/५३/२००४ दि.३०/१/२००४ अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती. सहाय्यक आयुक्त चौकशी तथा चौकशी अधिकारी यांनी श्री.चौधरी प्रा.शि.यांचे विरोधात ठेवण्यात आलेले आरोप १) अनाधिकृत गैरहजर राहणे २) विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम विहीत वेळेत पूर्ण न करणे या बाबत चौकशी केलेली आहे.

ज्याअर्थी या आरोपा बाबत सविस्तर चौकशी करुन मा.सहाय्यक आयुक्त (चौकशी) यांनी संदर्भ क्र.५ अन्वये क्र.विशा ४/ खाचौ / सी.आर.९/२००४ दिनांक २६/५/२००५ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केलेला आहे.उक्त चौकशी अहवालावरुन श्री.चौधरी प्रा.शि.यांनी दोन्ही दोषारोप मान्य करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केले बाबत अहवाल सादर केलेला आहे.

ज्याअर्थी श्री.चंदर उखा चौधरी प्रा.शि.यांना महाराष्ट्र जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग तीन नियम ४ (७) नूसार जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फे का करण्यात येवु नये ? या बाबत संदर्भ क्र.६ अन्वये अंतीम कारणे दाखवा नोटीस क्र. .शिक्षण/प्राथ-९/१७७/२०१० दि.१३/५/२०१० अन्वये देण्यात येवून त्या बाबतचा खुलासा २१ दिवसाच्या आत सादर करणे बाबत कळविण्यात आले होते.त्यानूसार श्री.चंदर उखा चौधरी प्रा.शि.यांनी दिनांक ५/६/२०१० रोजी खुलासा सादर केलेला आहे.श्री.चंदर उखा चौधरी प्रा.शि.यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केल्याचे सिध्द होते.

ज्याअर्थी श्री.चंदर उखा चौधरी प्राथ शिक्षक यांना मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे दालनात दिनांक ११/९/२०१७ रोजी त्यांची बाजु मांडणे कामी अंतीम संधी देण्यात आलेली आहे. सदर सुनावणी मध्ये श्री.चंदर उखा चौधरी प्रा.शि.यांनी अनाधिकृत गैरहजेरी बाबत समर्पक खुलासा सादर केलेला नाही.

त्याअर्थी श्री.चंदर उखा चौधरी प्राथमिक शिक्षक यांना त्यांचे विरुध्द खाते चौकशी प्रकरणी शासन होणे बाबत नियुक्त अधिकारी या नात्याने माझे मत झाल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये श्री.चौधरी प्राथमिक शिक्षक यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त वअपिल) नियम १९६४ चा भाग तीन नियम ४(७)नूसार श्री.चंदर उखा चौधरी प्राथमिक शिक्षक यांना जिल्हा परिषद सेवेतून बडतर्फे करणेत येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.चंदर उखा चौधरी प्राथमिक शिक्षक यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

१३/०९

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रत :- श्री.चंदर उखा चौधरी प्राथमिकशिक्षक जिल्हा परिषद शाळा बोरचोंड ता.सुरगाणा

प्रत :- गट शिक्षण अधिकारी.पंचायत समिती सुरगाणा.

Scanned by CamScanner